सेप्टीक टँकमधील मैला उपसा निर्धारित
वेळापत्रकानुसार (Sched. Desludging)
and मैला प्रक्रिया प्रकल्पाची देखभाल व
दूरुस्ती (FSTP O&M) करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग
स्वच्छ महाराष्ट्र अभियान संचालनालय
परिपत्रक क्र. राअस./मैला व्यवस्थापन
नरीमन पॉईट, मुंबई ४०००२१/११३९/२०२२
दिनांक:- ३० नोव्हेंबर, २०२२

वाचा:- १)शासन निर्णय, नगर विकास विभाग,क्रमांक: स्वमअ-२०१९/प्र. क्र.१२४/नवि-३४- दि. ८ नोव्हेंबर २०१९.
२)शासन निर्णय, नगर विकास विभाग, क्रमांक: स्वमअ- २०२२/प्र.क्र.७३/ नवि ३४- दि. १५जुलै २०२२.

स्वच्छ महाराष्ट्र अभियान (ना) १५ मे २०२२ पासून महाराष्ट्रात राबविण्यात येत आहे. दिनांक १ ऑक्टोबर २०१७ रोजी महाराष्ट्राचा संपुर्ण नागरी भाग हागणदरीमुक्त घोषीत करण्यात आला आहे. हा दर्जा टिकवून ठेवणे तसेच राज्यातील नागरीकांना शौचालयांच्या चांगल्या सुविधांसह शहरांमधील शौचालयांच्या सेप्टीक टँक मधील मैल्याचे सुरक्षित व नियमित व्यवस्थापन करून त्यावर प्रक्रीया करून या शहरांना “ओडीएफ++” दर्जा प्राप्त करण्याच्या उद्देशाने राज्य शासन निर्णय, नगर विकास विभाग,क्रमांक: स्वमअ-२०१९/प्र. क्र.१२४/नवि-३४- दि. ८ नोव्हेंबर २०१९ नुसार राज्यातील ३११ शहरांमध्ये मैला प्रक्रिया केंद्र (Fecal Sludge Treatment Plant) उभारणी करण्यास मान्यता दिली आहे. तसेच, शासन निर्णय, नगर विकास विभाग, दि. २१ मार्च, २०२२ अन्वये ज्या शहरांकडे सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प (Sewage Treatment Plant)अथवा मैला प्रक्रिया केंद्र (FSTP) नाही अशा शहरांना मैल्यावर सहप्रक्रिया करण्याकरीता लगतच्या शहरातील सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प (STP) मध्ये सहप्रक्रिया करण्यास मान्यता देण्यात आली आहे. ज्या शहरामंध्ये सेप्टिक टँक मध्ये जमा झालेल्या मैला वर प्रक्रिया करण्यासाठी तो मैला उपसा करणे गरजेचे आहे आणि त्यासाठी नियमीत पद्धत्तीने तो मैला उपसा करणे गरजेचे आहे.

स्वच्छ भारत अभियान २.० च्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार राज्यातील १ लाखापेक्षा कमी लोकसंख्येच्या सर्व शहरांनीODF++ व किमान ५०% शहरांनी (सर्व महानगर पालिका संहित)Water+दर्जा अभियान कालावधीत प्राप्त करावयाचा आहे. ओडिएफ++ आणि वॉटर+ टूलकिट च्या मार्गदर्शक सूचनांनुसार नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना ओडिएफ++ आणि वॉटर+ प्रमाणीकरण प्राप्त करण्याकरता

३ वर्षातून एकदा शहरातील सेप्टिक टँक खाली करणे अनिवार्य आहे.सेप्टिक टैंक उपसा करण्यासाठीमैन्युअल स्कॅवेंजींग कायदा नं २५, २०१३ (THE PROHIBITION OF EMPLOYMENT AS MANUAL SCAVENGERS AND THEIR REHABILITATION ACT, २०१३) अन्वये हाताने किंवा सफाई कर्मचाऱ्यामार्फत मैला उपसणे हा गुन्हा आहे. त्यामुळे सेप्टिक टैंक उपसा करण्यासाठी यंत्रसामाग्रिंचा म्हणजे मैला गाडीचा उपयोग करणे आवश्यक असल्याची नोंद घ्यावी. तसेच कुठल्याही परिस्थिती मध्ये संदर्भधिन कायदा नियम व केंद्र शासन व राज्य शासनाच्या आदेशाचा भंग होणार नाही याची दक्षता घ्यावी. तसेच यापूर्वी सफाई मित्र सुरक्षा चैलेंज अंतर्गत सर्व स्वराज्य स्थानिक संस्थाना स्वच्छता सम्बंधित कामांसाठी यंत्रसामाग्रि घेणे अनिवार्य आहे.

सफाई मित्र सुरक्षा चॅलेंज अंतर्गत स्थानिक स्वराज्य संस्थांनी पुढील मुद्दे लक्षात घ्यावेत

सफाईमित्र सुरक्षा चॅलेंज साठी खालील ३ मुद्दे महत्वाचे आहेत –

१. नागरिकांचे सक्षमीकरण
- ७ दिवस पूर्ण २४ तास १४४२० हा मदतसेवा दूरध्वनी
- जनजागृती मोहीम

२. यांत्रिक पद्धतीने सफाई काम:
- यंत्रसामुग्री आणि पायाभूत व्यवस्था
- मनुष्यबळ

३. यांत्रिक पद्धतीने सफाई काम
- क्षमता वाढीचे उपाय
- सफाई मित्रांना सक्षम करणे.

सफाई मित्र सुरक्षा चॅलेंजचे प्रमुख उद्दिष्ट हे गटारे आणि सेप्टिक टाक्या साफ करतानाचा धोका टाळणे आणि ते साफ करण्यासाठी यांत्रिकीकरणास प्रोत्साहन देणे हा आहे. तसेच या अंतर्गत सेप्टिक टाक्या साफ करणे आणि गटारे साफ करणे याबद्दल नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण करणे हाही एक महत्वाचा उद्देश आहे.सफाई मित्र सुरक्षा चॅलेंज अंतर्गत काही ठराविक कालावधीने गटारे साफ करणे, तसेच शाश्वत देखभाल आणि दुरुस्ती, शहरातील सांडपाणी आणि मैलाच्या ट्रीटमेंटसाठी हवी तेवढी ट्रीटमेंट कॅपॅसिटी आणि सेप्टिक टँक चा कालबाह्य पद्धतीने उपसा हे महत्वाचे घटक आहेत.(संदर्भ - सफाईमित्र सुरक्षा चॅलेंज चे केंद्रीय गृहनिर्माण व शहरी कार्य मंत्रालयामार्फत प्रकाशित करण्यात आलेले टूलकिट)

गृहनिर्माण तथा शहरी कार्यमंत्रालय (MoHUA) द्वारा निर्गमित केलेल्या ODF++ निकषानुसार ज्या शहरांमध्ये भुयारी गटारे नसतील किंवा १००% भुयारी गटारे नसतील त्या सर्व शहरांनी शहरातील सर्व सेप्टीक टँक ३ वर्षातून किमान १ वेळाउपसा करून आपले शहरातील मैला प्रक्रिया प्रकल्प किंवा सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पावर प्रक्रिया करावीअशा सूचना आहेत व तसेच शहरातील मैला प्रक्रिया प्रकल्पाची देखभाल व दुरुस्ती हि वेळोवेळी करावी.यासाठी नागरी स्थानिक स्वराज्य संस्था यांना उपरोक्त कामासाठी मार्गदर्शक सुचना कळवण्यात येत आहेत. स्थानिक परिस्थिती विचारात घेता मुख्याधिकारी (नगर परिषद/नगर पंचायत)यांनी यथोचीत बदल करता येईल.

अ. <u>मैला उपसा निर्धारीत वेळेप्रमाणे करण्यासाठीची कार्यपध्दती</u>

१. शहरात ज्या भागात सांडपाणी व्यवस्था उपलब्ध नाही अशा भागांचे सर्वेक्षण करून सेप्टिक टाक्यांची संख्या सुनिश्चीत करावी. सर्वेक्षण करत असताना घर क्रमांक, वैयक्तिक शौचालय आहे की नाही, वैयक्तिक शौचालय हे सेप्टीक टँकला जोडलेले आहे की नाही याबाबत नोंद घ्यावी.तसेच सेप्टीक टँकच्या ठिकाणास Geo Tagging करून Google Earth वर स्थापित करून त्याचा नकाशा (Mapping) बनवावा. यासाठी महानगरपालिका, नगरपरिषदा यांना घरपट्टी, पाणी पट्टी, मालमत्ता कराच्या रेकॉर्ड चा वापर करता येईल

२. सेप्टिक टाक्यांची संख्या सुनिश्चीत केल्यानंतर प्रतिवर्षी शहरातील एकूण सेप्टिक टँक पैकी किमान ३३% सेप्टिक टँक उपसा केले जातील अशा प्रकारे नियोजन करावे.

३. सफाई मित्र सुरक्षा चॅलेंज अंतर्गत नमूद केल्याप्रमाणे तांत्रिक पद्दतीने म्हणजेच यांत्रिकी मैला गाडीच्या साहाय्याने सेप्टिक टँक चा उपसा करावा. तसेच मैन्युअल स्कॅवेंजींग कायदा नं २५, २०१३ (THE PROHIBITION OF EMPLOYMENT AS MANUAL SCAVENGERS AND THEIR REHABILITATION ACT, २०१३) अन्वये हाताने किंवा सफाई कर्मचाऱ्यामार्फत मैला उपसला जाणार नाही याची खबरदारी घ्यावी. शहरामध्ये निर्धारित वेळापत्रकानुसार सेप्टीक टँक उपसा (SCHEDULE DESLUDGING) सुरू झालेनंतर स्थानिक स्वराज्य संस्थानी त्याचेलॉगबूक बनवून त्यामध्ये नियमित नोंद घेण्यात यावी.

४. सेप्टीक टँक उपसा करताना सफाई मित्र सुरक्षित शहर या उप्रक्रमातील सुरक्षिततेची सर्व खबरदारी घेणे आवश्यक आहे. संबधित संस्था यासाठी प्राधान्याने यांत्रीक साधनांचा वापर करतील हे पाहावे. तसेच संबंधीत कर्मचाऱ्यांना यासाठी आवश्यक सर्व प्रकारची सुरक्षात्मक साधने (PPE KITS) पुरवणे व संबंधीत कर्मचाऱ्यांनी त्याचा वापर करणे बंधनकारक असेल.

५. सेप्टिक टाक्यांचा उपसा ३ वर्षाच्या निर्धारित कालावधीत करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या साधनसामग्री व मनुष्यबळाचे मुल्यमापन करावे. त्यानंतर स्थानिक स्वराज्य संस्थेकडे उपलब्ध असलेल्या साधनसामग्री व मनुष्यबळाची गणना करण्यात येऊन अतिरिक्त लागणाऱ्या साधनसामग्री व मनुष्यबळाची निश्चीती करावी.

६. अतिरिक्त लागणाऱ्या साधनसामग्री व मनुष्यबळासाठी शहरातील बचत गट/सफाई कामगार यांचे गट अथवा खाजगी संस्था यांची या कामासाठी नेमणूक विहित कार्यपद्धतीने केली जाऊ शकते. बचत गटांना या कामासाठी आवश्यक साधनसामग्री उपलब्ध होण्याकरीता बँकेद्वारे कर्ज उपलब्ध करून देण्यासाठी मदत करावी. तसेच NSKFDC (National Safai Karmachari Finance & Development corp.) द्वारे त्यांना कर्ज उपलब्ध करून देता येईल. तसेच निर्धारित वेळापत्रकानुसार सेप्टीक टँक उपसा व्यवस्थापन करण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्था स्वनिधीचा वापर करु शकतात. तसेच स्थानिक स्वराज्य संस्था त्यांच्याकडे सद्यस्थितीत आकारण्यात येत असलेल्या मालमत्ता कराद्वारे किंवा मैला व्यवस्थापन कर ला मालमत्ता कराचा भाग बनवून त्या द्वारे, सेप्टिक टँक उपसा करणे व मैला प्रकिया केंद्र चालवणे याकरिताचा वापर शुल्क बंधनकारक करू शकतात किंवा सेप्टिक टँक

उपसा करण्यासाठीचे व मैला प्रक्रिया केंद्र चालविण्याकरिताचे आकारण्यात येणारे उपयोगिता शुल्क, मालमत्ता कराद्वरे भागवता येईल.

७. स्वच्छभारत अभियान (नागरी) २.० अंतर्गत City Sanitation Action Plan प्रमाणेनिर्धारित वेळा पत्रका नुसार सेप्टीक टँक उपसा करण्यासाठी डिस्लजिंग व्हेइकल/व्हॅक्युम एम्टीयर इत्यादी आवश्यक साधनांच्या खरेदीसाठी निधी अनुज्ञेय आहे. तसेच या कामासाठी सार्वजनिक खाजगी भागीदारी (PPP) तत्वावरील मॉडेलचा देखील विचार करता येईल.

८. निर्धारित वेळापत्रका नुसार सेप्टीक टँक उपसा होत असल्याचे सुनिश्चीत करण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थेने सुयोग्य संनियंत्रण(MONITORING) करावे. यासाठी अत्याधुनिक माहिती तंत्रज्ञानाधारीत(डिजीटल) साधनांचा अवलंब करावा यासाठी राज्य अभियान संचालनालया मार्फत सहाय्य केले जाईल.

९. शहरात निर्धारित वेळापत्रकानुसार सेप्टीक टँक उपसा करणेबाबत प्रभावी जनजागृती मोहिम राबवणे सार्वजनिक स्वच्छता व आरोग्य राखण्यासाठी निर्धारित वेळापत्रकानुसार ३ वर्षातून किमान १ वेळा सेप्टीक टँक उपसा करणे गरजेचे आहे. यासाठी नागरीक सहकार्य करतील किंवा स्वत:हून पुढाकार घेतील अशा प्रकारची प्रभावी जनजागृती मोहीम शहरांनी आपल्या स्तरावर राबवावी. या साठी स्वच्छ महाराष्ट्र अभियान (ना) २.० अभियान माहिती, शिखण, आणि संवाद (IEC) घटकातील उपलब्ध निधी मधून करता येईल

१०. निर्धारित वेळापत्रकानुसार सेप्टीक टँकमधील मैला उपसा करण्यासाठी संगणक माहिती प्रणालीचा वापर करता येईल. स्थानिक स्वराज्य संस्था निर्धारित वेळापत्रकानुसार सेप्टीक टँकमधील मैला उपसा करणे ह्याचे व्यवस्थित रेकॉर्ड ठेवण्यासाठी SANITAB (सर्वेक्षण आणि GEOTAGGING) व Maha Sanitrack (प्रक्रियावर नियंत्रण ठेवण्यासाठी) या ॲप्लिकेशन चा उपयोग करू शकतात.


११. स्थानिक स्वराज्य संस्थेचे निर्धारित वेळापत्रकानुसार मैला उपसा करण्यसाठी सोबत जोडलेल्या SOP (Standard Operating Produce) चे अवलंब करता येईल.

१२. सेप्टीक टँक उपसा करण्याशी संबंधीत सर्व सफाई कर्मचाऱ्यांना योग्य व नियमीत प्रशिक्षण देण्यात यावे.

## ब .मैला प्रक्रिया प्रकल्प (देखभाल व दुरुस्ती)

राज्यातील बहुतांश शहरांमध्ये मैला प्रक्रिया प्रकल्पाचे (FSTP) बांधकाम पूर्ण होउन ते कार्यान्वीत करण्यात आली आहेत. या शहरांनी "ओडीएफ++" दर्जा प्राप्त करणे व तो टिकवून ठेवण्याच्या दृष्टिने मैला प्रक्रिया केंद्राचे (FSTP) दैनंदिन परिचालन योग्य रितीने होऊन त्याची नियमित देखभाल-दुरूस्ती करणे अत्यंत आवश्यक आहे. तसेच, तेथील गतिविधींचे चेकलिस्ट नुसार दैनिक लॉगबुक ठेवणे आवश्यक आहे. याकरिता सोबतच्या परिशिष्ट अ/ब/क/ड/इ/फ मध्ये दैनंदिन परिचालन व देखभाल-दुरूस्तीतसेच दैनिकलॉगबुक ठेवणे आणि चेकलिस्ट बाबत मार्गदर्शक सूचना देण्यात आल्या आहेत. तरी राज्यातील सर्व नागरी स्थानीक स्वराज्य संस्थांनी त्याचावापर करावा.मैला प्रक्रिया प्रकल्प व्यवस्थितरित्या चालू ठेवण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांनी फक्त मैला प्रक्रिया केंद्राच्या देखभाल व दुरुस्तीसाठी समर्पित सफाई कर्मचारी किंवा

घनकचरा केंद्रावर काम करणारे कर्मचारी किंवा खाजगी संस्थेची नेमणूक करावी आणि त्यांच्यामार्फत मैला प्रक्रिया प्रकल्पासाठी आवश्यक असलेले लॉगबुक, चेकलिस्ट इ. दस्तऐवज तयार ठेवावेत. तसेच सर्व विभागीय सह आयुक्त व जिल्हा सह आयुक्त यांनी याचा वेळोवेळी आढावा घेऊन या संचालनालयाला अहवाल पाठवावा.




निर्धारित वेळापत्रकानुसार सेप्टीक टँक उपसा व्यवस्थापन व तसेच शहरातील मैला प्रक्रिया प्रकल्पाची देखभाल व दुरुस्ती करण्यासाठीचा एकत्रित आराखडा स्थानिक स्वराज्य संस्थांनी बनवावा. या एकात्मिक (INTEGRATED) मॉडेलचा उपयोग करून स्थानिक स्वराज्य संस्थाना एकाच वेळी निर्धारित वेळापत्रकानुसार सेप्टीक टँक उपसा व्यवस्थापन आणि मैला प्रक्रिया प्रकल्पाची देखभाल व दुरुस्ती ह्या दोन गोष्टी साध्य करणे सोपे जाईल.शहरांनी असा एकत्रित आराखडा (INTEGRATED)तयार करुन तो या संचालनालयास दिनांक १५ /१२ /२०२२ पर्यंत पाठवावा. तसेच या अंतर्गत केलेल्या कामकाजाचा तीमाही अहवाल नियमितपणे विभागीय सह आयुक्त यांच्या मार्फत संचालनालयाला पाठवण्यात यावा.

(समीर उन्हाळे)
राज्य अभियान संचालक
स्वच्छ महाराष्ट्र अभियान (ना.)

प्रत:-

१. आयुक्त, महानगरपालिका (सर्व)
२.सह आयुक्त,नगरपरिषद प्रशासन, विभागीय आयुक्त कार्यालय (सर्व)
३. सह आयुक्त,नगरपरिषद प्रशासन, जिल्हाधिकारी कार्यालय (सर्व)
४. मुख्याधिकारी, नगरपरिषदा/नगरपंचायती (सर्व)

परिशिष्ट -अ

## १. प्रक्रिया घटकांकरिता दैनंदिन चालन व देखभाल चेकलि स्ट (तपासणीसूची) - नमुना

| दिनांक:<br>चालकांचे (OPERATOR) नाव: | | | | |
|---|---|---|---|---|
| कामाचे स्वरूप | वेळ | काम करून झाले आहे/झाले नाही | शेरे | स्वाक्षरी |
| प्रवाहाचा झोत स्प्लॅश पॅडच्या दिशेने ठेवून स्लज ड्राईंग बेड मैल्याने भरणे | | | | |
| स्लज ड्राईंग बेड/बेड्समधून सुकलेला/कोरडा झालेला गाळ बाहेर काढणे | | | | |
| स्लज ड्राईंग बेड/बेड्समधून सुकलेला/कोरडा झालेला गाळ बाहेर काढल्यावर फिल्टर मीडीया/माध्यम समतल करणे | | | | |
| पीजीएफ मधील प्रक्रिया झालेले सांडपाणी पंपाच्या साहाय्याने साठवण टाकीमध्ये सोडणे | | | | |
| क्लोरिन डोसिंग युनिटच्या साहाय्याने निर्जंतुकीकरण करणे | | | | |

परिशिष्ट – ब

## २. प्रक्रिया घटकांकरिता आवर्ती चालन व देखभाल चेकलिस्ट – नमुना

| दिनांक:<br>चालकांचे नाव: | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| साप्ताहिक करावयाची कामे | | | | | |
| कामाचे स्वरूप | काम केल्याचा दिनांक व स्वाक्षरी | | | | |
| | | | | | |
| स्लज ड्राईंग बेड/बेड्समधून वाढलेले तण किंवा नको असलेली झुडुपेनियमितपणे काढुन टाकणे | | | | | |
| स्लज ड्राईंग बेडची निस्सारण प्रणाली व तपासणी चेंबर्स यांची देखरेख व देखभाल करणे | | | | | |
| एबीआर युनिट मधील मळी व गाळ यांच्या पातळीवर देखरेख करणे | | | | | |
| पीजीएफ मधील झाडांची छाटणी करणे | | | | | |
| नको असलेले तण काढून टाकणे व पीजीएफ मधून वाळलेली पाने काढून टाकणे | | | | | |
| गुणवत्ता चाचणी करिता प्रत्येक घटकामधून नमुने संकलित करणे | | | | | |
| वार्षिक व आवश्यकते नुसार करावयाची कामे | | | | | |
| कामाचे स्वरूप | काम केल्याचा दिनांक | | | | स्वाक्षरी |
| स्लज ड्राईंग बेडमधील फिल्टर मीडीया पुन्हा भरणे | | | | | |
| एबीआरमधून अतिरिक्त मळी व गाळ काढणे व ते स्लज ड्राईंग बेड्सवर ओतणे | | | | | |
| पीजीएफमधून फिल्टर मीडीया पुन्हा भरणे | | | | | |
| पीजीएफ युनिटमध्ये मेलेल्या झाडांच्या जागी नवीन झाडे लावणे | | | | | |
| हवामानापासून बचाव करण्याकरिता वार्षिक रंगकाम | | | | | |
| संरचनात्मक दुरुस्ती कामे | | | | | |
| प्लंबिंग प्रणालींची देखभाल | | | | | |

<u>परिशिष्ट -क</u>

## ३. FSTP कर्मचाऱ्यांकरिता उपस्थिती नोंदणी पुस्तक

| FSTP कर्मचाऱ्यांकरिता उपस्थिती नोंदणी पुस्तक | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| वर्ष- २०२२ | | | | | |
| महिना - जानेवारी | कर्मचारी १ | कर्मचारी २ | कर्मचारी ३ | कर्मचारी ४ | कर्मचारी ५ |
| दिनांक | | | | | |
| | नाव: | नाव: | नाव: | नाव: | नाव |
| | हुद्दा: | हुद्दा: | हुद्दा: | हुद्दा: | हुद्दा: |
| १ | स्वाक्षरी | | | | |
| २ | | | | | |
| ३ | | | | | |
| ४ | | | | | |
| ५ | | | | | |
| ६ | | | | | |
| ७ | | | | | |
| ८ | | | | | |
| ९ | | | | | |
| १० | | | | | |
| ११ | | | | | |
| १२ | | | | | |
| १३ | | | | | |
| १४ | | | | | |
| १५ | | | | | |
| १६ | | | | | |
| १७ | | | | | |
| १८ | | | | | |
| १९ | | | | | |
| २० | | | | | |
| २१ | | | | | |
| २२ | | | | | |
| २३ | | | | | |
| २४ | | | | | |
| २५ | | | | | |
| २६ | | | | | |

परिशिष्ट -ड

## ४. FSTP वर मैला घेऊन येणाऱ्या वाहनांची नोंदवही

| अनु क्र. | दिनांक | मैला गोळा केलेले ठिकाण | डीस्लजर(गाळ काढून त्याची वाहतूक करणारे) | वाहन क्र. | चालकाचे नाव | वाहन येण्याची वेळ | मैल्याचे प्रमाण लिटर्समध्ये | नोंद करणाऱ्या कर्मचाऱ्यांची स्वाक्षरी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | १/२/२२ | साहीद नगर (मालमत्ता क्र. एबीसी०११२३४) मधील घर | डीस्लजर्स (खासगी) | XYZ | | | २,००० | |
| २ | २/२/२२ | वाणी विहार मधील हॉटेल (मालमत्ता क्र. एबीसी ०२५६७८)- फेरी १ | डीस्लजर्स (खासगी) | XYZ | | | ५,००० | |
| ३ | २/२/२२ | वाणी विहार मधील हॉटेल (मालमत्ता क्र. एबीसी०२५६७८)- फेरी २ | डीस्लजर्स (खासगी) | XYZ | | | ३,००० | |
| ४ | ३/२/२२ | शासकीय संस्था | नगरपालिका | XYZ | | | ३,५०० | |
| ५ | ३/२/२२ | वस्ती पातळीवरील शौचालय | नगरपालिका | XYZ | | | ५,००० | |

नोंद:- वरील तपशील मध्ये दिलेली माहिती (उदाहरणे) ही फक्त अनुकरणाकरीता दिलेली आहे.

परिशिष्ट -इ

## ५. प्रयोगशाळा चाचणीनोंदवही

| तारीख | वेळ | नमुना घेतलेले ठिकाण | तापमान °C | PH पीएच | बीओडी मिग्रॅ/ली) | सीओडी (मिग्रॅ/ली) | टीएसएस (मिग्रॅ/ली) | एकुण फॉस्फेट (मिग्रॅ/ली) | टीकेएन (मिग्रॅ/ली) | एकुण कोलिफॉर्म(एमपीएन/१०० मिली) | मैल्यामधील कोलिफॉर्म(एमपीएन/१०० मिली) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | CPCBचे मानक मुल्य | | | | | | | | | |
| | | SDBमध्ये आलेल्या सांडपाण्याची/ मैल्याची तपासणी | | | | | | | | | |
| | | SDB मधुन बाहेर जाणाऱ्या पाण्याची तपासणी | | | | | | | | | |
| | | ABR मधून बाहेर जाणारे पाणी | | | | | | | | | |
| | | पीजीएफ मधून बाहेर जाणारे सांडपाणी | | | | | | | | | |

परिशिष्ट -फ

# ६. अभ्यागतांकरिता नोंदवही (Visitors)

| अनु. क्र. | नाव/संस्थेचे नाव | हुद्दा | संस्था | FSTP ला भेट दिल्याची तारीख | ई-मेल ऍड्रेस | दूरध्वनी क्र. | सही (स्वाक्षरी) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | | | | | | |
| २ | | | | | | | |
| ३ | | | | | | | |
| ¤ | | | | | | | |